अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थातील फार्मसी अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यासाठी शासनाची मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय :- क्र.टिइएम-२००८/(२२० /०८)/तांशि-१,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : - ११ जून, २००८.

संदर्भ:- १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद , नवी दिल्ली यांचे दिनांक २५ जुलै, २००८४ जून, २००८ चे पत्र तसेच ७ सप्टेंबर, २००७ चे पत्र

२) शासन निर्णय:- क्र.टिईएम-२००७/( २८३/०७)/तांशि-१, दिनांक ३० जून, २००७

**शासन निर्णय :-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या दिनांक ७ सप्टेंबर, २००७ च्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २००७-२००८ करिता खाली नमूद संस्थेच्या प्रवेशक्षमतेत पुढीलप्रमाणे बदल केला होता. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १ | धुळे चॅरिटेबल सोसायटीचे अण्णासाहेब रमेश अजमेरा कॉलेज ऑफ फार्मसी, धामणगांव रोड, देवपूर धुळे-४२४००६ | एम. फार्म, ( फार्मास्युटीक्स ) | ८ वरुन १० |

तथापि रिट याचिका क्र. ३९१६/२००१ अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली विरुध्द महाराष्ट्र शासन या याचिकेसंदर्भात दि. १७.०९.२००१ रोजी देण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने दि. ३० जून, नंतर अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून मान्यता प्राप्त प्रस्तावांना पुढील शैक्षणिक वर्षाकरिता मान्यता देण्यात येते. आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थेस शैक्षणिक वर्ष २००८-२००९ पासून वरीलप्रमाणे तिच्या नावासमोर दर्शविलल्या प्रवेशक्षमतेसह अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक

शा- १२२५
दि. १९/६/०८

कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगांव

संबंधित संस्था (संचालकां मार्फत )

प्रत माहितीसाठी

अतिरिक्त सचिव ( तांत्रिक ), भारत सरकार, आखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११०००२

सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई

निवड नस्ती.

C:\AICTE Approvals\shramsadhana jalgaon.doc